**राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे यांना बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली लागु करण्याबाबत -**

## महाराष्ट्र शासन

परिपत्रक : क्रमांक : मातंसं-२००९/९२४/३९,
सामान्य प्रशासन विभाग,
सातवा मजला, राजमुद्राच्या बाजुला,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ७ जुलै २००९.

### परिपत्रक

प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहण्यासाठी मंत्रालयात दिनांक ११ मे २००९ पासून बायोमेट्रिक पध्दत सुरु करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने शासकीय कर्मचारी / अधिकारी यांच्या उपस्थितीबाबत राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे यांनी देखिल बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब करावा. बायोमेट्रिक पध्दतीसाठी मशिन्स खरेदी, देखभाल इत्यादिसाठी आवश्यक असणारा दरकरार शासनाच्या संकेतस्थळावर www.maharashtra.gov उपलब्ध आहे. यासंबंधी होणारा सर्व खर्च संबधित विभागाने करावा. कर्मचारी व अधिका-यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब तीन महिन्याच्या आत करावा.

या परीपत्रकाची प्रत महाराष्ट्र शासन www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक संकेतांक २००९०७०९१५२०५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. संतोष भोगले )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**
शासनाचे सर्व अ.मु.स./प्र.स./सचिव,
सर्व विभागीय आयुक्त,
राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे